जनसंपर्क कक्ष
17 MAR 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# 'मोफत शिक्षण' पदव्युत्तर स्तरापर्यंत विस्तारावे

## लक्ष्मीकांत देशमुख; विद्यापीठातील राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेचा समारोप

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सर्वांना सक्तीची आणि मोफत शिक्षण योजना राबविली, त्यामागे महात्मा जोतिराव फुले यांची प्रेरणा होती. शाहू महाराजांनी शिक्षणाचे महत्त्व जाणून आपल्या संस्थानात शिक्षणप्रसारासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले. सध्या बहुजन विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका वाढलेला आहे. त्यामुळे मोफत शिक्षणाची योजना पदव्युत्तर स्तरापर्यंत विस्तारण्याची आवश्यकता आहे', असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे शाहू संशोधन केंद्र आणि इतिहास अधिविभागातर्फे मानव्यशास्त्र इमारतीत आयोजित राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेच्या समारोपाप्रसंगी 'राजर्षी शाहू आणि भारतीय संविधान' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते.



डॉ. लक्ष्मीकांत देशमुख.

देशमुख म्हणाले, 'राजर्षी शाहू महाराजांनी केलेले कायदे सामाजिक परिवर्तन आणि न्यायाचे उत्तम निदर्शक आहेत. त्यांनी रुजविलेल्या सामाजिक न्यायविषयक मूल्यांचे प्रतिबिंब भारतीय संविधानात उमटल्याचे दिसून येते. शाहू महाराजांचे कार्य आणि त्यांनी विविध समाजघटकांच्या कल्याणासाठी केलेले कायदे यांचा अभ्यास केला असता मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी आग्रही असणारा लोकराजा आपल्या नजरेसमोर उभा राहतो.'

डॉ. पवार म्हणाले, 'कल्याणकारी राज्यव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी केला. शेतीचे अर्थकारण सक्षम करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. तळागाळातील माणसे समृद्ध करण्याचे कार्य त्यांनी केले.' यावेळी ज्येष्ठ विचारवंत खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर, डॉ. अवनिश पाटील, रणधीर शिंदे आदी उपस्थित होते.

### डॉ. मुणगेकर यांच्या उपस्थितीने उत्साह

■ या परिषदेतील डॉ. यशवंतराव थोरात, तारा भवाळकर, अशोक चौसाळकर, आनंद मेणसे, डॉ. देशमुख यांच्या व्याख्यानास डॉ. मुणगेकर पूर्णवेळ उपस्थित होते. त्यांची उपस्थिती प्रत्येक वक्त्यासह उपस्थितांचा उत्साह वाढविणारी ठरली.

जनसंपर्क कक्ष
17 MAR 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शाहूंच्या सामाजिक न्यायाचे संविधानात प्रतिबिंब

## डॉ. लक्ष्मीकांत देशमुख : शिवाजी विद्यापीठ शाहू स्मृती परिषद समारोप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजर्षी शाहू महाराजांनी केलेले कायदे सामाजिक परिवर्तन आणि न्यायाचे उत्तम निदर्शक आहेत. त्यांनी रुजवलेल्या सामाजिक न्यायविषयक मूल्यांचे प्रतिबिंब भारतीय संविधानात उमटल्याचे दिसून येते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे शाहू संशोधन केंद्र आणि इतिहास अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीत आयोजित दोनदिवसीय राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेच्या समारोप समारंभात 'राजर्षी शाहू आणि भारतीय संविधान' या विषयावर



ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते.

देशमुख म्हणाले, शाहू महाराजांचे कार्य आणि त्यांनी विविध समाजघटकांच्या कल्याणासाठी केलेले कायदे यांचा अभ्यास केला असता मानवीमूल्यांच्या प्रस्थापनेसाठी आग्रही असणारा लोकराजा नजरेसमोर उभा राहतो. महाराजांनी स्त्री शिक्षणासह स्त्रियांवरील अत्याचार दूर करण्यासाठी केलेले कायदेही काळाच्या खूप पुढे होते.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. पवार म्हणाले, कल्याणकारी राज्य व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी केला. त्यामुळे करवीर संस्थान हे आधुनिक महाराष्ट्राचे तीर्थक्षेत्रच म्हणावे लागेल. तळागाळातील माणसे समृद्ध करण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. यावेळी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्यासह डॉ. अवनिश पाटील, डॉ. रणधीर शिंदे यांच्यासह संशोधक विद्यार्थी, शिक्षक आणि शाहूप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

1 7 MAR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# राजर्षी शाहूंच्या सामाजिक न्यायाचे राज्यघटनेत प्रतिबिंब

## ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यांचे प्रतिपादन : राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेची शिवाजी विद्यापीठात सांगता

प्रतिनिधी
कोल्हापूर

राजर्षी शाहू महाराजांनी केलेले कायदे हे सामाजिक परिवर्तन आणि न्यायाचे उत्तम निदर्शक आहेत. शाहूराजांनी रुजवलेल्या सामाजिक न्यायविषयक मूल्यांचे प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेत उमटले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, निवृत्त जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात शाहू संशोधन केंद्र आणि इतिहास अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मानव्यशास्त्र विभागात आयोजित दोनदिवसीय राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेची गुरुवारी सांगता झाली. यप्रसंगी 'राजर्षी शाहू आणि भारतीय संविधान' यावर ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेच्या सांगता प्रसंगी बोलताना निवृत्त जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख.

निवृत्त जिल्हाधिकारी देशमुख म्हणाले, राजर्षी शाहूराजांनी सर्वांना सक्तीची आणि मोफत शिक्षण योजना राबवली, त्यामागे महात्मा फुलेंची प्रेरणा होती. त्यांनी संस्थानात शिक्षण प्रसारासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले. विषमता निर्मूलन, समता प्रस्थापनेचा मार्ग शिक्षणातून जातो, ही जाणीव त्यामागे होती. विविध जाती–धर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी २३ वसतीगृहांच्या निर्मितीमागेही त्यांची हीच प्रेरणा आहे.

ते म्हणाले, शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणासह स्त्रियांवरील अत्याचार दूर करण्यासाठी केलेले कायदेही काळाच्या खूप पुढे होते. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांच्या नोंदीचा कायदा, विधवा पुनर्विवाह कायदा हे त्यांचा स्त्रियांकडे पाहण्याचा उदात्त मानवतावादी दृष्टीकोन दर्शवतात.

डॉ. जयसिंगराव पवार यांनी शेतीचे अर्थकारण सक्षम करण्यासाठी शाहूराजांनी राधानगरी धरण बांधल्यामुळे करवीर संस्थान हे आधुनिक महाराष्ट्राचे तीर्थक्षेत्रच आहे. डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. डॉ. अवनीश पाटील यांनी आभार मानले. यावेळी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर, संशोधक विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेची गुरुवारी दुपारी मानव्यशास्त्र सभागृहात सांगता झाली. पहिल्या सत्रात डॉ. सदानंद मोरे यांनी 'राजर्षी शाहू आणि महाराष्ट्रातील प्रबोधन परंपरा' यावर मांडणी केली. प्राचार्य आनंद मेणसे यांनी 'राजर्षी शाहू आणि सामाजिक न्याय' यावर मार्गदर्शन केले. दुपारी परिषदेची सांगता निवृत्त जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांच्या 'राजर्षी शाहू आणि भारतीय संविधान' या व्याख्यानाने झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परीषदेचे अध्यक्ष डॉ. जयसिंगराव पवार होते.

### ब्राह्मणेतर चळवळीचा राज्याच्या राजकारणावर प्रभाव : डॉ. चौसाळकर

राजर्षी शाहूराजांनी सत्यशोधक चळवळीला मोठे बळ दिले. तिच्या व्यापक आधारावरच पुढे ब्राह्मणेतर चळवळ गतीने वाढली. या चळवळीचा महाराष्ट्राच्या राजकारणावर मोठा प्रभाव पडला आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेमध्ये गुरुवारी 'शाहू महाराज आणि ब्राह्मणेतर चळवळ' यावर ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी खासदार भालचंद्र मुणगेकर, डॉ. जयसिंगराव पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. चौसाळकर म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीचे पुनरुज्जीवन केले. त्यांनी ब्राह्मणेतर पक्षाला सर्वतोपरी मदतीचे धोरण स्वीकारले होते. त्यांनी ब्राह्मणेतर वृत्तपत्रे, सत्यशोधक जलसे यांना सातत्याने सामाजिक प्रबोधनासाठी प्रेरित केले. ब्राह्मणेतर चळवळीच्या वृद्धीसाठी आवश्यक पार्श्वभूमी निर्माण करण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. १९२० मध्ये मुंबई प्रांतिक निवडणुकीत ब्राह्मणेतर पक्षानें १११ पैकी १६ जागा जिंकल्या. मात्र, शाहूराजांच्या माघारी ब्राह्मणेतर पक्षात वाद सुरू झाल्याने सत्यशोधक त्यापासून दुरावले. ब्राह्मणेतर पक्षाने शेतकरी, कामगारांचे प्रश्न हिरिरीने मांडले. त्यानंतर सत्यशोधक चळवळीचा समाजवादाकडे प्रवास सुरू झाला. शेतकरी कामगार पक्षाच्या तत्त्वांमध्ये सत्यशोधक, ब्राह्मणेतर पक्षाचाच गाभा दिसतो. आजही राज्य आणि देशाच्या राजकीय पटलावर प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष स्वरुपात सत्यशोधक–ब्राह्मणेतर चळवळीचे अस्तित्व दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले.

लोकमत

# कवी सौमित्र आज शिवाजी विद्यापीठात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या



मराठी विभागाने आयोजित कवी कुसुमाग्रज व्याखान मालेसाठी कवी सौमित्र ऊर्फ अभिनेता किशोर कदम आज, शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात येणार आहेत. कुसुमाग्रजांच्या शोधात सौमित्र या विषयावर जाधव बोलणार आहेत. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. मराठी विभागात सकाळी ११.३० वाजता होणाऱ्या या व्याख्यानासाठी रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मराठी मंडळाचे अध्यक्ष डॉ. रणधीर शिंदे आणि मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ संघाची आगेकूच

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरु चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत बुधवारी चौथ्या दिवशी यजमान शिवाजी विद्यापीठासह लोणेरे, परभणी आणि नागपूर संघांनी प्रतिस्पर्धी संघावर मात केली.

पहिल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकचा ६ गडी राखून पराभव केला. दुसऱ्या सामन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे संघाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ संघाचा ६६ धावांनी पराभव केला. तिसऱ्या सामन्यात मराठवाडा कृषी विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठ-ब संघाचा ९ गडी राखून पराभव केला.

17 MAR 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. यशवंतराव थोरात : राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषद


# शाहू महाराजांच्या जडणघडणीत गुरू फ्रेझर यांचा महत्त्वाचा वाटा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राजर्षी शाहू महाराजांच्या जडणघडणीत त्यांचे गुरू सर स्टुअर्ट फ्रेझर यांचा महत्त्वाचा वाटा होता, असे मत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी बुधवारी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि राजर्षी शाहू संशोधन केंद्र यांच्या वतीने आयोजित केलेल्या राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेच्या पहिल्या सत्रात 'राजर्षी शाहू आणि युरोपीयन विचारविश्व' या विषयावर डॉ.थोरात बोलत होते.

## माझी कोल्हापूरची भेट सार्थकी लागली

कोणतेही पूर्वसंदर्भ उपलब्ध नसताना डॉ. थोरात यांनी अभिनव व शास्त्रशुद्ध या विषयाची मांडणी केली. श्रोत्यांसमोर एकेक मुद्दा ठेवत, त्याच्या शक्याशक्यतांची सर्वकष चर्चा केली. पुढे जात त्यांनी केलेली मांडणी इतकी प्रभावी ठरली की, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी व डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी उभे राहून मानवंदना दिली. व्यासपीठावर जाऊन डॉ. मुणगेकर यांनी डॉ. थोरात यांना भेटून माझी कोल्हापूर भेट सार्थकी लागली, असे आवर्जून सांगितले.



डॉ. थोरात म्हणाले, वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी भारतीय लोकसेवा परीक्षा उत्तीर्ण होऊन बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये रुजू झालेल्या फ्रेझर यांच्यावर राजकुमारांच्या ट्युटरशिपची जबाबदारी सोपविण्यात आली. एकीकडे युरोपातील मुक्त विचारांचे वारे, तर दुसरीकडे वसाहतवादी भूमिकेतून भारतामध्ये करावयाचा वावर अशा दुहेरी भूमिकेतून फ्रेझर यांच्यासह आयसीएसमधील सर्वच अधिकाऱ्यांना काम करावे लागत असे. फ्रेझर यांनी तेरा वर्षांमध्ये अवघ्या तीन राजकुमारांना शिकविले. त्यामध्ये शाहू महाराजांसह भावनगरचे भावसिंगजी महाराज आणि म्हैसूरचे कृष्णराज वाडियार यांचा समावेश होता. शाहू महाराज, भावसिंगजी महाराज आणि कृष्णराज महाराज या तिघांच्या कार्यामागील समप्रेरणा कोण असतील, तर ते म्हणजे त्यांचे गुरू सर स्टुअर्ट फ्रेझर होय, असे सिद्ध करता येऊ शकते.

या विषयाच्या अनुषंगाने अधिक संशोधन होण्याची नितांत गरज असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. डॉ.नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

लोकमत

# बृहत आराखड्यासाठी मागवल्या सूचना

## शिवाजी विद्यापीठ : मंगळवारी बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा २०२४-२५ ते २०२८-२९ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यासक्रम याची ठिकाणे निश्चित करुन शास्त्रशुध्द पध्दतीने नवीन बृहत आराखडा बनवण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. यासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यासाठी आवश्यक शैक्षणिक सुविधांसाठी सूचना मागवल्या आहेत. यासंदर्भात साताऱ्यात २०, कोल्हापुरात २१ आणि सांगलीत २३ मार्चला या बैठका होणार आहेत.प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी ही माहिती दिली.

विद्यापीठ क्षेत्रातील शिरवळसारख्या शेवटच्या टोकावरील विद्यार्थ्यांचा विचार करुन भौगोलिक, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेउन तेथील मनुष्यबळ, बदलते शिक्षण यांचा विचार करून या विद्यार्थ्याला सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०७ मधील तरतुदीनुसार हा बृहत आराखडा तयार करण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे. पाच वर्षांपूर्वी मांडलेला बृहत आराखडा माहेडच्या मान्यतेसाठी पाठिवला होता, मात्र डॉ. के. बी. पाटील समितीचा अहवाल पाहून त्यांनी ती योजना तातडीची बाब म्हणून फक्त २०१८-१९ या एकाच वर्षासाठी मान्य केली होती. यंदा जिल्ह्यातील पाच वर्षांच्या शैक्षणिक गरजांचा विचार करून हा आराखडा तयार केला जात आहे. अंतिम बैठकीपूर्वी प्रत्येक जिल्ह्यातील कोणाही व्यक्तींना सूचना मांडता येणार आहेत.

> विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शैक्षणिक संस्था प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी आणि शेतकऱ्यांसह अन्य घटकांनी या सूचना गुगल मिटवरील अर्जाद्वारे नोंदवाव्यात, याची माहिती या बृहत आराखड्यात समाविष्ट केली जाईल.
>
> -डॉ. विलास सोयम, उपकुलसचिव, संलग्नता विभाग.

### अशा आहेत जिल्हावार बैठका

- २० मार्च : लालबहाद्दूर शास्त्री महाविद्यालय, सातारा (सकाळी ११ वाजता)
- २१ मार्च : गोपालकृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर (सकाळी ११ वाजता)
- २३ मार्च : श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली (सकाळी ११ वाजता)

17 MAR 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठासह परभणी, नागपूर संघांची आगेकूच

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या चौथ्या दिवशी (गुरुवार) यजमान शिवाजी विद्यापीठासह लोणेरे, परभणी आणि नागपूर संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळविले. मात्र, शिवाजी विद्यापीठ-ब संघास मात्र पराभव पत्करावा लागला.

**महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरु चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा**

### शिवाजी विद्यापीठाचा ६ विकेटस्‌नी विजय

नाशिक संघाने २० षटकांत ९ बाद १२३ धावा केल्या. नंदकिशोर ठाकरेने २४, राजेंद्र शहाणेने २६ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठाच्या विनायक शिंदेने ३ विकेटस् घेतल्या. उत्तरादाखल शिवाजी विद्यापीठाने १६.४ षटकांत ४ बाद १२७ धावांसह विजय मिळविला. विक्रम कोंढावळेने नाबाद ६४, अनिल पाटीलने २२ धावा केल्या. विक्रम कोंढावळे सामनावीर ठरला.

### लोणेरे संघाचा ६६ धावांनी विजय

लोणेरे संघाने २० षटकांत ८ बाद १६६ धावा केल्या. ओंकार बोदीळकरने ५० धावा केल्या. नाशिकच्या योगेश जाधव, दिलीप भंडारी यांनी प्रत्येकी दोन विकेटस् घेतल्या. उत्तरादाखल नाशिकचा संघ १०० धावांत गुंडाळला. ३ विकेटस् घेणारा लोणेरेचा ओंकार बोदीळकर सामनावीर ठरला.

### परभणी संघाचा ९ विकेटस्‌नी मोठा विजय

शिवाजी विद्यापीठ-ब संघाने १२.३ षटकांत सर्वबाद ९६ धावा केल्या. परभणीच्या मारुती शेलालेने ४ विकेटस् घेतल्या. परभणी संघाने केवळ एक विकेट गमावून ९८ धावांसह विजय साजरा केला. ४७ धावा करणाऱ्या मनोज कऱ्हाळेला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

### नागपूरचा ४ विकेटस्‌नी विजय

जळगाव संघाने २० षटकांत ६ बाद १५४ धावा केल्या. जितेंद्र पाटीलने नाबाद ५७ धावा केल्या. नागपूरच्या अजित माळीने ४ विकेटस् घेतल्या. नागपूरने हे आव्हान ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. अजय गावंडेने नाबाद ६८ तर सतीश यादवने २५ धावा केल्या. अजित माळी सामनावीर ठरला.

1 7 MAR 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या बृहत् आराखड्याचे काम सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या कालावधीचा नवीन महाविद्यालय, विद्या शाखेच्या पंचवार्षिक बृहत् आराखड्याचे काम सुरू केले आहे. २५ मार्चपर्यंत सर्वेक्षण करून माहिती जाणून घेतली जाणार आहे.

विद्यापीठ परिक्षेत्रातील विविध परिसरांची भौगोलिक, सामाजिक तसेच आर्थिक निकड जाणून घेऊन संबंधित ठिकाणाच्या आवश्यकतेनुसार त्या-त्या ठिकाणी नवे विषय, अभ्यासक्रम, महाविद्यालय, मान्यताप्राप्त संस्था, संशोधन केंद्र, सॅटेलाईट केंद्र यांच्यासाठी बृहत आराखड्यामध्ये तरतूद करणे जरूरीचे आहे. याकरिता या विशिष्ट ठिकाण, परिसराची माहिती करून घेण्यासाठी शास्त्रोक्त सर्वेक्षणाचा कार्यक्रम विद्यापीठाने सुरू केला आहे.

सर्वेक्षणात विविध घटकांकडून शैक्षणिक बाबीविषयी माहिती जाणून घेतली जाणार आहे. सर्वेक्षणासाठी विद्यापीठाद्वारे **Google Form** विकसित केला आहे. विद्यापीठाच्या **www. unishivaji. ac. in** या संकेतस्थळावर मुख्य पृष्ठावर **http:/// www. unishivaji. ac. in/ bcud / Perspective- Plan- 2024 2028** या नावाने वेब लिंक उपलब्ध आहे. विद्यापीठ संकेतस्थळावरील वेबलिंकद्वारे प्रश्नावलीत योग्य ती माहिती भरून सर्वेक्षणामध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मराठी विभागाच्या वतीने शुक्रवारी सकाळी ११.३० वाजता मराठी विभाग येथे कवी कुसुमाग्रज व्याख्यानमालेत अभिनेते किशोर कदम 'कुसुमाग्रजांच्या शोधात... सौमित्र' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के असतील.

सकाळ

# राजर्षींकडून सत्यशोधक चळवळीला मोठे बळ : डॉ. अशोक चौसाळकर

कोल्हापूर, ता. १६ : 'राजर्षी शाहू महाराज यांनी सत्यशोधक चळवळीला मोठे बळ दिले. तिच्या व्यापक आधारावरच पुढे ब्राह्मणेतर चळवळ गतीने फोफावली आणि महाराष्ट्राच्या राजकारणावर तिने मोठा प्रभाव टाकला. आजही देशाच्या राजकीय पटलावर अशा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष स्वरुपामध्ये सत्यशोधक-ब्राह्मणेतर चळवळीचे अस्तित्व असल्याचे दिसून येते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी आज येथे केले.

राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेमध्ये आज दुसऱ्या दिवशी 'शाहू महाराज आणि ब्राह्मणेतर चळवळ' या विषयावर ते बोलत होते. डॉ. चौसाळकर म्हणाले, 'राजर्षी शाहू महाराज मधुकर वृत्तीचे होते. चांगल्या बाबी समजून



डॉ. अशोक चौसाळकर

घेऊन त्यांना पाठिंबा देण्यात ते अग्रेसर असत. ब्राह्मणेतर वृत्तपत्रे, सत्यशोधक जलसे यांना सातत्याने सामाजिक प्रबोधनाच्या कार्यासाठी महाराजांनी प्रेरित केले. ब्राह्मणेतर पक्षामध्ये उमद्या नेतृत्वाच्या विकासालाही त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यातूनच भास्करराव जाधव, आण्णासाहेब लठ्ठे असे नेते उदयास आले.' राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले.

1 7 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाला सर्वसाधारण विजेतेपद

## आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स; रेश्मा केवटेला अर्धमॅरेथॉनचे सुवर्णपदक

नागपूर, ता. १६ : तमिळनाडू शारीरिक शिक्षण विद्यापीठाच्या यजमानपदाखाली चेन्नई येथे झालेल्या ८२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरने ९१ गुणांसह सर्वसाधारण विजेतेपद मिळविले. शेवटच्या दिवशी शिवाजी विद्यापीठाच्या रेश्मा केवटेने महिलांच्या अर्धमॅरेथॉन, तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शुभम भंडारेने पुरुषांच्या तीन हजार मीटर स्टीपलचेस शर्यतीत सुवर्णपदक पटकावले.

साताऱ्याची असलेल्या आणि गेल्या वर्षी पुण्यात झालेल्या 'सकाळ'च्या अर्ध मॅरेथॉन शर्यतीत प्रथम स्थान मिळविणाऱ्या रेश्माने एक तास १८ मिनिटे १४ सेकंदांत शर्यत पूर्ण करून सुवर्णपदकावर नाव कोरले. पुरुषांच्या शर्यतीत शिवाजी विद्यापीठाच्या विवेक मोरेने रौप्यपदक जिंकताना एक तास सात मिनिटे २४ सेकंदात शर्यत पूर्ण केली. त्याने दहा हजार मीटर शर्यतीत



चेन्नई : अर्धमॅरेथॉन शर्यतीत जिंकणारी रेश्मा केवटे (मध्यभागी). शेजारी प्राजक्ता गोडबोले (रौप्य, उजवीकडे) व नीतू कुमारी (ब्रॉंझ).

रौप्यपदक जिंकले होते. पुरुषांच्या ८०० मीटर शर्यतीत ओंकार कुंभारला ब्रॉंझपदकावर समाधान मानावे लागले. त्याने एक मिनीट ५०.१० सेकंद अशी वेळ दिली. महिलांच्या ८०० मीटर शर्यतीत रोहिणी पाटीलनेही ब्रॉंझपदक जिंकले. तिने दोन मिनिटे ०७.८९ सेकंद अशी वेळ दिली. प्राजक्ता शिंदेने दहा हजार मीटर शर्यतीत रौप्य व पाच हजार मीटर शर्यतीत ब्रॉंझपदक जिंकले. महिलांच्या ४०० मीटर हर्डल्स शर्यतीत अनुष्का कुंभारला रौप्यपदक मिळाले.

### सुदेष्णा वेगवान धावपटू

साताऱ्याची असलेल्या सुदेष्णा शिवणकरने महिलांची १०० मीटर शर्यत जिंकून स्पर्धेत वेगवान धावपटूचा किताब जिंकला. तिने ११.७७ सेकंद अशी कारकिर्दीतील सर्वोत्तम वेळ दिली. २०० मीटरमध्ये तिला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले.

### शुभमचा स्पर्धा विक्रम

पुरुषांच्या तीन हजार मीटर स्टीपलचेस शर्यतीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शुभम भंडारेने स्पर्धा विक्रमासह सुवर्णपदक जिंकले. त्याने आठ मिनिटे ४७.३३ सेकंद अशी वेळ देताना गेल्या वर्षी नोंदविलेला आठ मिनिटे ५१.३३ सेकंदाचा विक्रम मोडीत काढला. यात शिवाजी विद्यापीठाच्या सुशांत जेधेने आठ मिनिटे ४९.३४ सेकंदात ब्रॉंझपदक जिंकले.

1 7 MAR 2023 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ, लोणेरे, परभणी, नागपूर संघ विजयी

## कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा



▸सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा सुरू आहे. त्यात आज चौथ्या दिवशी यजमान शिवाजी विद्यापीठासह लोणेरे, परभणी, नागपूर संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळविला.

आजच्या पहिल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठावर सहा गडी राखून विजय मिळविला. नाशिक संघाने नाणफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतली. या संघाने २० षटकात नऊ बाद १२३ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना शिवाजी विद्यापीठाने १६.४ षटकांत चार बाद १२७ धावा केल्या. विक्रम कोंढावळे सामनावीर ठरला. दुसऱ्या सामन्यात लोणेरेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठावर नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठावर ६६ धावांनी मात केली. लोणेरे संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत आठ बाद १६६ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल नाशिकचा संघ २० षटकात १० बाद १०० धावाच करू शकला. ओंकार बोदिळकर सामनावीर ठरला. दुपारच्या दुसऱ्या सामन्यात नागपूरच्या महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठाने जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठावर चार गडी राखून जिंकला.

नागपूरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी घेतली. जळगाव संघाने २० षटकांत सहा बाद १५४ धावा केल्या. नागपूरने हे आव्हान सहा गड्यांच्या मोबदल्यात १५.४ षटकांत पार केले. अजित माळी सामनावीर ठरले.


### शिवाजी विद्यापीठ-ब संघाचा पराभव

■ दुपारच्या सत्रात शिवाजी विद्यापीठ-ब आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्यात सामना झाला. हा सामना परभणीने तब्बल नऊ गडी राखून जिंकला. शिवाजी विद्यापीठ-ब संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना १२.३ षटकांत सर्व बाद ९६ धावा केल्या. परभणी संघाने अवघ्या एका गड्याच्या मोबदल्यात ९.५ षटकांत ९८ धावा केल्या. त्यात मनोज कऱ्हाळे यांच्या ४७ धावांचा समावेश राहिला. सामनावीर त्यांनाच घोषित करण्यात आले.

17 MAR 2023
जनसंपर्क कक्ष
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ २९ मार्चला

## राज्यपाल रमेश बैस अध्यक्षस्थानी; कुलपती कार्यालयाकडून पत्र



रमेश बैस

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षान्त समारंभ २९ मार्च रोजी होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस असणार आहेत. त्याबाबतचे पत्र कुलपती कार्यालयाकडून आज विद्यापीठ प्रशासनाला प्राप्त झाले.

विद्यापीठाने १६ फेबुवारी रोजी दीक्षान्त समारंभ घेण्याचे निश्चित केले होते. त्यासाठी इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशनचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे हे प्रमुख पाहुणे म्हणून ठरले. ६६ हजार ४५७ पदवी प्रमाणपत्रांची छपाई पूर्ण झाली; पण तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला. त्यासह विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलन सुरू केले होते. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने काही अपरिहार्य कारणास्तव दीक्षान्त समारंभ स्थगित करण्याचा निर्णय १३ फेब्रुवारी रोजी जाहीर केला. नवे राज्यपाल रमेश बैस



यांनी पदभार स्वीकारला. त्यानंतर या समारंभाचे आयोजन आणि त्यांच्या उपस्थितीबाबत विद्यापीठ प्रशासनाने कुलपती कार्यालयाला पत्र पाठविले. त्यांच्या उत्तराच्या प्रतीक्षेत विद्यापीठ प्रशासन होते. कुलपती कार्यालयाकडून प्राप्त पत्रात दीक्षान्त समारंभासाठी २९ मार्च ही तारीख निश्चित केली आहे. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाची या समारंभासाठी नव्या निमंत्रण पत्रिकांची छपाई करणे, कार्यक्रमाची रूपरेषा ठरविणे आदी स्वरूपातील तयारी सुरू होणार आहे.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ क्षेत्रात परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीत सुरू आहेत. गुरुवारी एम. बी. ए., बी. टेक., मास्टर ऑफ लॉ. बी. आर्च. एम.टेक. एम. आर्च जनरल या परीक्षा ऑफलाईन झाल्या. या परीक्षासाठी २०३३ विद्यार्थी उपस्थित होते. याशिवाय बी.आय.डी. सेमिस्टर १,२,३, बी.व्होक., हॉर्टिकल्चर सायन्स अँड टेकच्या चार अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले. आजपर्यंत २७३ अभ्यासक्रमांचे निकाल घोषीत झाले. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्यांवर नियंत्रणासाठी भरारी पिके स्थापन केली आहेत. गुरुवारी या पथकाकडून कोल्हापूर, साताऱ्यात कोणत्याही गैरप्रकाराची नोंद झालेली नाही, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाने दिली.

17 MAR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील ८ कोटींच्या भुयारी मार्गासाठी मंजुरी

## उच्च व तंत्र शिक्षण विभागाची माहिती : सार्वजनिक बांधकाम विभागाची माहिती : 'तरुण भारत संवाद'च्या वृत्ताची दखल

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा विस्तार होत असताना विद्यापीठातील काही विभाग मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वारासमोरील जागेत गेली आहेत. येथून रस्ता असल्याने अन्यावर वाहतूक अधिक असल्याने विद्यार्थ्यांच्या जिवीताचा धोका निर्माण झाला होता. त्यासाठी रस्त्यापलीकडील विभागांत जाण्यासाठी भुयारी मार्गाची मागणी 'तरुण भारत संवाद'ने केली होती. या मार्गासाठी ८ कोटी ४८ लाख रुपयांच्या प्रस्तावाला उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रशासकीय मंजुरी दिली, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली.

राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे ३ वर्षांपूर्वी शिवाजी विद्यापीठाने भुयारी मार्गाचा प्रस्ताव दिला होता. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने अंदाजपत्रकही सादर केले होते. विद्यापीठाचा सुमारे ८५३ एकर परिसर आहे. महापालिकेच्या ताब्यातील जुन्या पुणे—बेंगलोर महामार्गामुळे याचे पूर्व आणि पश्चिम असे भाग झाले आहेत. या मार्गावर चौपदरीकरण झाले आहे. विद्यापीठाच्या पश्चिम भागात सध्या मुख्य प्रशासकीय इमारत, अन्य इमारती, क्रीडा संकुल आहे. तर पूर्व भागात तंत्रज्ञान, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलाजी, शाहू संशोधन केंद्र, शिक्षणशास्त्र आदी विभाग आहेत. याशिवाय यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, जर्नालिझम व मास कम्युनिकेशन सेंटर आहे. त्यामुळे पूर्व भागातील सुमारे दोन ते तीन हजार विद्यार्थी, शिक्षक, पालकांची या मुख्य मार्गावरून विद्यापीठात दररोज ये-जा सुरू असते. सध्या महामार्गावर वाहतूक वाढल्याने विद्यार्थी, शिक्षकांसाठी ती धोकादायक झाली आहे. त्यामुळे विद्यापीठाला पूर्व-पश्चिम जोडणाऱ्या भुयारी मार्गाची मागणी वाढत होती.



शिवाजी विद्यापीठाने या भुयारी मार्गासाठी ८ कोटी ४८ लाख ८१ हजार ९४५ रुपयांचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाला सादर केले होते. त्याला तांत्रिक मान्यता मिळाली होती. दरम्यान, या भुयारी मार्गाच्या कामाला गुरुवारी प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. दरम्यान हे काम करताना पुरातत्त्व विभाग आणि महापालिकेची पूर्व परवानगी घ्यावी. पर्यावरण विभागाची मान्यता घ्यावी, याचे काम सुरू असतानाच विद्युतीकरणाचे नियोजन करून कामे पूर्ण करावीत, यात दिव्यांगांसाठी आवश्यक सुविधा असाव्यात, असे नमूद केले आहे. यासंदर्भात प्रशासकीय मंजुरीचे आदेश राज्याचे उपसचिवांनी काढले आहेत. त्यामुळे विद्यापीठातील भुयारी मार्गाच्या कामाला गती आली आहे.

17 MAR 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अ. भा. क्रिकेट स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ महिला संघ पात्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

कलिंगा युनिव्हर्सिटी, भुनेश्वर येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या महिला क्रिकेट संघाने इंदोरच्या देवी अहिल्या विद्यापीठ संघाचा ४३ धावांनी पराभव केला. या विजयामुळे शिवाजी विद्यापीठाने पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेत मानांकन मिळवले.

म्हैसूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघ पात्र ठरला असुन अंतिम चार संघांमध्ये दाखल झाला आहे. स्पर्धेत सुरुवातीपासूनच बहारदार खेळ करणाऱ्या



कोल्हापूर : म्हैसुर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रिकेट स्पर्धेसाठी पात्र ठरलेला शिवाजी विद्यापीठाचा महिला क्रिकेट संघ.

शिवाजी विद्यापीठाच्या संघाने इंदोर संघाचा ४३ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठाने वीस षटकात १४३ धावा केल्या उत्तरदाखल फलंदाजीसाठी उतरलेल्या इंदोर विद्यापीठ संघाला अवघ्या १०० धावात गुंडाळून सामना जिंकला.

तत्पूर्वी झालेल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने गुजरात टेकनॉलॉजि विद्यापीठ संघाला ४३ धावात गुंडाळले. हे सोपे आव्हान केवळ दोन षटकात पुर्ण करत सहज विजय मिळवला. दुसऱ्या सामन्यात गुजरातच्या वीर वर्धमान विद्यापीठ संघाने प्रथम फलंदाजी करत १३९ धावांचे आव्हान उभारले. प्रत्युत्तर दाखल खेळताना शिवाजी विद्यापीठ संघाने हे लक्ष सहजपणे १ गड्याच्या मोबदल्यात पूर्ण करत सामना जिंकला. तिसऱ्या सामन्यातही शिवाजी विद्यापीठ संघाने सौराष्ट्र विद्यापीठ या संघावर दणदणीत विजय मिळवला. शिवाजी विद्यापीठ संघाने प्रथम गोलंदाजी करताना सौराष्ट्र संघाला ६३ धावात गुंडाळले. प्रत्युत्तर दाखल खेळतांना नाबाद ६५ धावा करत सहज विजय मिळवला. डॉ. रोहित पाटील व प्रा. देवदत्त महात्मे संघ व्यवस्थापक व मार्गदर्शक म्हणून काम करत आहेत.